दैनिक पुढारी
८ जुलै १९९९

योजनाही युनिट ट्रस्टने उघडल्या आहेत.

## स्टुडंटस् फेडरेशनच्या निबंध स्पर्धांचा निकाल

कोल्हापूर, दि. ७ : स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया, कोल्हापूर जिल्हा शाखेच्यावतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यातील मोठ्या गटात न्यू कॉलेजच्या कु. मीना शरद कुलकर्णी हिने प्रथम क्रमांक मिळविला.

तर कमला कॉलेजच्या कु. कमला रामचंद्र खोत हिने द्वितीय व न्यू कॉलेजच्या कु. वैशाली विश्वनाथ जोशी व पी.डी. अध्यापक कॉलेज, कसूर (कराड) च्या विठ्ठल नामदेव जाधव यांनी तृतिय क्रमांक मिळविला.

लहान गटात अजय अनंत हरळीकर, (न्यू हायस्कूल) - प्रथम, राहुल रामचंद्र मुचंडीकर (महाराष्ट्र हायस्कूल), द्वितीय, समीर भीमराव घारे -(कॉमर्स कॉलेज) याने तृतीय क्रमांक मिळविला.

या स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ येत्या दि. १४ जुलै रोजी दुपारी एक वाजता दे.भ. रत्नाप्पा कुंभार, कॉलेज ऑफ कॉमर्स, बिंदू चौक, कोल्हापूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

...मनपातर्फे नेहरू रोजगार